New Man International Journal of Multidisciplinary Studies
(UGC Approved Journal No. 45886)
ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

**33.**

# संशोधन पद्धती – व्यष्टी अध्ययन (Case Study)

**श्री. गजानन पी. खिस्ते**
माहिती शास्त्रज्ञ
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
khistegajanan@gmail.com

**डॉ. राहुल के. देशमुख**
सहाय्यक–ग्रंथपाल
राजीव गांधी कृषी महाविद्यालय, परभणी
rahulkd02@gmail.com

***सार***

*एखाद्या सामाजिक घटकांचा सर्वसमावेशक असा अभ्यास म्हणजे व्यष्टी अध्ययन होय. एखाद्या व्यक्तीचा, सारखेपणा अभ्यास करू शकतो. त्या घटकाचा सखोल अभ्यास केला जातो. या बाबतीत व्यष्टी अभ्यास ऐतिहासिक संशोधनपद्धतीकडे काही प्रमाणात झुकते. पण त्याच बरोबर व्यष्टीच्या वर्तमानकाळाशी म्हणजेच वर्णनात्मक पद्धतीशी अधिक जवळचे नाते आहे. प्रस्तुत लेखात वर्णनात्मक संशोधन पद्धती मध्ये व्यष्टी अध्ययन पद्धती चा वापर करताना या व्यष्टी अध्ययन पद्धतीबाबत थोडक्यात माहिती स्पष्ट करण्यात आली आहे.*
***कळ शब्द*** *– व्यष्टी अध्ययन पद्धत, व्याख्या, प्रक्रिया, गृहितके*

## प्रस्तावणा

व्यष्टी अध्ययन ही एक संशोधनाची प्रसिद्ध पद्धत आहे. या पद्धतीचा प्रथम वापर इ.स. १८८२ मध्ये फेडरीक प्लॅन यांनी घरगुती अंदाजपत्रकाचा अभ्यास करण्यासाठी केला होता. त्यानंतर हर्बट स्पेन्सर यांनी या पद्धतीचा वापर मानववंशशास्त्राचा (Ethonographic) अभ्यास करण्यासाठी केला होता. त्यानंतर ही पद्धत शास्त्रीय पद्धत म्हणून वापरात आली.

## व्यष्टी अध्ययन पद्धत

इंग्रजीतील Case या शब्दासाठी 'व्यष्टी' हा शब्द वापरला जातो. रॉबर्ट यिन यांच्या मतानुसार एखादी संस्था, संस्थेतील विभाग व व्यक्ती ही संशोधनासाठी व्यष्टी असू शकते. व्यष्टी अध्ययनातील व्यष्टीचे तिच्या स़द्यस्थितीत अध्ययन केले जाते. म्हणजेच संबंधित व्यष्टी जेथे आहे, जशी आहे त्या स्थितीत त्या व्यष्टीचा अभ्यास केला जातो. व्यष्टीचा तिच्या वास्तव स्थितीमध्ये अभ्यास केला जातो. उदाहरणार्थ विशिष्ट सार्वजानिक ग्रंथालयाचे व्यष्टी अध्ययन करते वेळेस संबंधित सार्वजनिक वाचनालयाचे वाचक, ग्रंथ विक्रेते, शासन, लेखक, सामाजिक रूढी, परंपरा इत्यादी वास्तव बाबींचा विचार केला जाईल.

## व्याख्या

पी व्ही यंग यांच्या मते '' व्यष्टी अध्ययन म्हणजे सामाजिक गट जसे की व्यक्तीचा समुह, कुंटुब, संस्था, सांस्कृतिक जमाव किंवा एखादी विशिष्ट जमात यांच्या जीवनांचा चिमित्सक व संपूर्ण अभ्यास होय.''

शिवपाल यंग यांच्या मते 'व्यष्टी अध्ययनपद्धत म्हणजे ज्या पद्धतीमध्ये संशोधक स्वत:चे कौशल्य व पद्धतीचा वापर करून व्यक्तीगत पातळीवर सर्वसमावेशक अभ्यास करणे होय'.

लिडी आणि ओर्मरॉड यांच्या मतानुसार व्यष्टी अध्ययन हे गुणात्मक संशोधन आहे. व व्यष्टी अध्ययनामध्ये संस्था, व्यक्ती, उपक्रम वा घटनांबाबत सखोल माहिती संकलित करून त्या माहितीचे विश्लेषण केलें जाते.

फिडेल यांच्या मतानुसार विशिष्ट विषयाचा/संकल्पनांचा/ घटनांचा, त्या जशा घडत आहेत किंवा घडलेल्या आहेत तसा, त्यांचा अभ्यास करणे म्हणजे व्यष्टी अध्ययन.

## व्यष्टी अध्ययन पद्धतीची वैशिष्टये

१. विशिष्ट गटाचा सर्वसमावेशक अभ्यास–या पद्धतीमध्ये संशोधनासाठी निवडलेल्या सामाजिक गटाच्या विषयांचा व्यापक अभ्यास केला जातो. या पद्धतीमध्ये संशोधन विषयांच्या सर्व बाजूना समान महत्व दिले जाते. की, संख्यात्मक, गुणात्मक

२. गुणात्मक संशोधन पद्धती – व्यष्टी अध्ययनादरम्यान संशोधन निरीक्षण, मुलाखत, विविध प्रकारचे प्रलेख इत्यादी मार्गानी संशोधन समस्येबाबत गुणात्मक माहिती संकलित करतो व त्या माहितीचे गुणात्मक तंत्रांच्या साहाय्याने विश्लेषण करतो, म्हणून या संशोधन पद्धतीला 'गुणात्मक संशोधन पद्धती' असे म्हणतात.

३. विशिष्ट क्षेत्राशी संपर्क साधने–या पद्धतीमध्ये विषयांचा अभ्यास करण्यासाठी संशोधक विशिष्ट क्षेत्राचा अभ्यास विस्तृत प्रमाणात करत असतो.
४. क्लिष्ट समस्या समजून घेण्यासाठी उपयुक्त – व्यष्टी अध्ययनामध्ये एकाच घटकाचा अभ्यास केला जातो. शिवाय हा अभ्यास सखोल असतो त्यामुळे व्यष्टी व्यस्थित समजून घेणे शक्य होते. क्लिष्ट समस्या समजून घेण्यासाठी व्यष्टी अध्ययकाकडे साधनेही असतात आणि वेळही असतो.
५. विषयांच्या अभ्यासासाठी वेळ लागतो– या पद्धतीमध्येय विशिष्ट गटाचा व्यक्तीगत, कौंटुबीक, सामाजिक बाजूचा विस्तृत अभ्यास केला जातो. त्यामूळे या पद्धतीमध्ये विषयांच्या अभ्याससाठी जास्त वेळ लागतो.
६. एकापेक्षा अधिक माहिती संकलन साधनांचा वापर– माहिती संकलनासाठी विविध साधनांचा वापर हे व्यष्टी अध्ययनाचे आणखी एक वैशिष्टय आहे.

**व्यष्टी अध्ययन पद्धतीची प्रक्रिया**

- संशोधकाने विषयांची व्याप्ती एक व्यक्ती किंवा अनेक व्यक्तींच्या समुहाची आहे हे ओळखणे.
- संशोधकाने विषयासंबधी सर्व प्रकारच्या माहितीचा संग्रह करावा.
- संशोधकाने व्यक्तीगत माहितीस्त्रोत जसे की, पत्रे डायऱ्या, चरित्र, नोंदी इत्यादीची सत्यता पडताळून त्यावरून आवश्यक असल्यास गृहितके मांडावीत.
- संशोधकाने मुलाखत, वेळापत्रक इत्यादी साधनांचा वापर करून माहितीचा संग्रह व स्पष्टीकरण करावे.
- संशोधकाने संख्यात्मक माहितीपेक्षा गुणवत्तापूर्ण माहितीला जास्त महत्व देऊन अशा माहितीचा संग्रह करावा.
- विषया संबधीच्या माहितीच्या प्रत्येक नोंदीच्या बाबींचा समावेश असावा जसे की,
  अ. माहिती मिळाली त्यावेळचा दिनांक
  ब. ज्या व्यक्तीकडून माहिती मिळाली त्यांचे नाव
  क. जशी माहिती मिळाली त्याचे विवरण
  ड. ज्या अटीवर माहिती मिळाली त्यांचे संक्षिप्त वर्णन
  इ. माहितीचा संग्रह करण्यासाठी वापरलेली तंत्रे व पद्धतीचा सारांश
- माहितीचा चिकित्सक व स्पष्टीकरणात्मक अभ्यास करण्यासाठी विविध कौशल्ये व तंत्रे यांचा वापर करावा.
- माहितीचे स्पष्टीकरण हे शास्त्रीय व सुलभ असावे.
- संशोधनाची अखेरची पायरी म्हणजे संशोधन अहवाल होय. या अहवालामध्ये संशोधनाची माहिती लेखी स्वरूपात दिलेली असते. संशोधनाची माहिती व निष्कर्ष सुलभ असावेत जेणेकरून वाचकांना/ इतर संशोधकांना संशोधनाची माहिती व गुणवत्ता त्वरीत समजेल

**माहिती संकलनाचे स्त्रोत**

व्यष्टी अध्ययनपद्धतीमध्ये माहिती संकलीत करण्यासाठी खालील स्त्रोताचा प्रामुख्याने वापर केला जातो.

**१. व्यक्तीगत कागदपत्रे**

अनेक व्यक्ती व्यक्तीगत / वैयक्तीक माहितीची नोंद ठेवण्यासाठी प्रलेख, पत्रे, आत्मचारित्रे, आठवणी, ध्वनीफित, इत्यादींचा वापर करतात अशा प्रकारची कागदपत्रे व्यष्टी अध्ययनपद्धतीमध्ये माहिती संकलनासाठी अंत्यत उपयुक्त असतात. त्याचबरोबर व्यक्तीने अनुभवलेल्या घटना, इतर व्यक्तीसोबतचा संबंध या बाबीही माहिती संकलनासाठी उपयोगी असतात.

**२. जीवनांचा इतिहास**

या पद्धतीमध्ये व्यक्तीच्या जीवनांचा इतिहास हा महत्वाचा माहितीचा स्त्रोत आहे. व्यक्तीच्या जीवनाचा इतिहास मुलाखत, आत्मचारित्रे इत्यादी साधनांद्वारे मिळविता येतो.

**३. इतर स्त्रोत**

वरील स्त्रोता व्यक्तीरिक्त इतर स्त्रोतामध्ये ही अप्रत्यक्षरित्या माहिती मिळते जसे की, ग्रंथ, नियतकालिके, सरकारी कागदापत्रे, विषयासंबंधी वाचनसाहित्य, विशिष्ट विषयावरील संशोधन, इतर कागदपत्रे जे समाजासाठी वारवांर प्रकाशित होत असतात.

**व्यष्टी अध्ययनाचे प्रकार**

विविध तज्ञांनी व्यष्टी अध्ययाचे अनेक प्रकार सांगितले आहेत. जसे बर्नस् यांनी व्यष्टी अध्ययनाचे खालील सहा प्रकार सांगितलेले आहेत.

१. ऐतिहासिक व्यष्टी अध्ययन
२. निरीक्षणात्मक व्यष्टी अध्ययन
३. मौखिक इतिहास व्यष्टी अध्ययन
४. प्रासंगिक व्यष्टी अध्ययन
५. उपयोगात्मक व्यष्टी अध्ययन
६. बहुपायऱ्यात्मक व्यष्टी अध्ययन

**यष्टी अध्ययनातील पायऱ्या –**

समस्या निर्धारण
माहिती संकलन
विश्लेषण आणि अर्थनिर्वचन
सिद्धांतीकरण आणि सामान्यीकरण
अहवाल लेखन

**व्यष्टी अध्ययन पद्धतीचे फायदे –**

१. या पद्धतीमूळे आपणास विशिष्ट विषयांची सखोल माहिती समजते. तसेच या पद्धतीमध्ये संशोधन विषयांची माहिती प्रत्यक्ष मिळविली जाते.
२. ही पद्धत संशोधकाला सामाजिक गटाचा नैसर्गिक इतिहास, त्यांचा इतर सामाजिक घटकांशी असलेला संबंध, इत्सादी माहिती मिळविण्यावर विशेष भर देते.
३. व्यष्टी अध्ययनपद्धत संशोधकाचा अनुभव, संशोधन क्षमता, कौशल्य वाढवते.
४. या पद्धतीमध्ये माहिती संकलना सोबतच त्यावर आधारित गृहितके मांडली जातात. त्यामुळे माहितीच्या सत्यतेसंबधी पडताळणी करण्यासाठी गृहितके उपयोगी पडतात.
५. ही पद्धत संकलित केलेल्या माहितीचे किंवा संशोधीत माहितीचे व्यक्तीगत जीवनातील महत्व शोधण्यास मदत करते.
६. या पद्धतीमध्ये विषयांचा सर्वागीण अभ्यास केला जातो. त्यामुळे स्वाभाविक ज्ञानाचे परिक्षेत्र वाढते.
७. व्यष्टी अध्ययन पद्धतीमधील तंत्रे समस्या सोडविण्यासाठी व व्यवस्थापनाच्या उद्देशासाठी आवश्यक आहेत.
८. व्यष्टी अध्ययन पद्धत अंत्यत लवचिक आहे. त्यामुळे माहिती संग्रह करण्याच्या सर्व तंत्रे, साधनांचा वापर केला जातो.

**व्यष्टी अध्ययन पद्धतीच्या मर्यादा**

१. संशोधकावर या पद्धतीमध्ये व्यवस्थित नियंत्रण ठेवता येत नाही. तसेच संशोधकाने मिळवलेल्या माहितीची सत्यता पडताळता येत नाही. त्यामुळे संशोधनाचे निष्कर्ष हे संपूर्णपणे अचूक असू शकत नाहीत.
२. या पद्धतीमध्ये असत्य माहितीला भरपूर वाव आहे. जसे की, खोटे संदर्भ देणे, चुकींचा विषय निवडणे, चुकीचे निरिक्षण करणे.
३. ही पद्धत मर्यादित विषयाशी संबंधित वापरली असेल तर ही पद्धत फारच खर्चिक व वेळखाऊ आहे.
४. व्यष्टी अध्ययन पद्धतीमध्ये काही वेळेस संशोधन आराखडयाची तत्वे बाजूला राहतात कारण संशोधक व सामाजिक गट किंवा इतर व्यक्तींचा परस्पराशी संबंध येऊन निपक्ष:पाती पणाची भावना नष्ट होते व चुकीची माहिती गोळा केल्या जाते.
५. व्यष्टी अध्ययन पद्धत विषयांची वैश्वीक, सामान्य बाजूची माहिती पुरवित नाही.

६. व्यष्टी अध्ययन पद्धतीमध्ये विषयांच्या प्रत्येक गटांचा संपूर्ण बाजूनी अभ्यास केला जातो. आणि त्यामुळे संशोधकाला आपणास विषयांच्या प्रत्येक गटाची सर्व माहिती आहे. असा आभास होतो. परंतु वस्तुस्थितीमध्ये विषयांच्या प्रत्येक गटांच्या अनेक बाजूचा भाग संशोधकाच्या नजरेत आलेला नसतो.

**व्यष्टी अध्ययन पद्धतीची गृहितके**

१. व्यष्टी अध्ययन पद्धत हा अविभाज्य संपूर्ण गट असून यामध्ये खंडाखंडाने किंवा अंशाने अभ्यास होत नाही.
२. व्यष्टी अध्ययन मधील विविध गटामध्ये स्पष्टपणे भिन्नता आहे तरी पण विविध गटामध्ये मूलभूत एकत्रीतपणा आहे.
३. मानवी वर्तवणूकीचा सहानभूतीपूर्वक अभ्यास फक्त व्यष्टी अध्ययनपद्धतीद्वारेच करणे शक्य आहे.
४. या पद्धतीमध्ये विषयांचा मागील इतिहास माहित नसल्यास केलेले संशोधन अपूर्ण राहते व निर्माण केलेले निष्कर्ष असत्य असतात.
५. व्यष्टी अध्ययनपद्धत पूर्णपणे शास्त्रीय पायाभूत पद्धत नाही तर या पद्धतीची फक्त पहिली पायरी शास्त्रीय आहे.
६. या पद्धतीमध्ये निवडलेला गट हा समाजाचे प्रतिनिधित्व करतो. या पद्धतीमध्ये निवडलेल्या गटाच्या प्रतिक्रिया व कार्य याद्वारे पूर्ण समाजाचे प्रतिबिंब चित्रित करण्याचा प्रयत्न केला जातो.
७. या पद्धतीमध्ये एका विशिष्ट गटाच्या अभ्यासावरून विश्वातील इतर समान गटाच्या बद्दल चर्चा व वर्तमानातील वाटचाल यावर विचार करता येतो.
८. सामाजिक घटक स्वाभावीक जास्त गुंतगुंतीचे/बिकट असतात आणि अनेक गटाचा सखोल अभ्यास करणे कठीण कार्य आहे. त्यामूळे संशोधकाने व्यष्टी अध्ययनपद्धतीचा वापर करून एका गटाचा संपूर्णपणे सखोल अभ्यास करावा.

**व्यष्टी अध्ययनपद्धतीची उदाहरणे**

ग्रंथालय व माहितीशास्त्रामध्ये आणि इतर क्षेत्रामध्ये ही व्यष्टी अध्ययनपद्धतीचा विविध ठिकाणी वापर केला जातो.

उदा— १. एखादया राज्यातील विद्यापीठ ग्रंथालयांचा अभ्यास.
२. विशिष्ट विभागातील ग्रंथालयांचा विकास व वाटचाल.

**सावधगिरी/काळजी**

गॉर्डन ऑलपोर्ट यांनी व्यष्टी अध्ययनपद्धती वापरताना खालील प्रकरची काळजी घेण्यास सांगीतले आहे.

१. या पद्धतीमध्ये संशोकाला माहिती मिळाविण्यासाठी जास्त वेळ लागतो. त्यामूळे संशोधकाने माहिती मिळवितांना संयम ठेवला पाहिजे.
२. जीवनाचा इतिहास हा संपूर्ण व ज्ञानी व्यक्तीने लिहलेला असावा.
३. माहिती निरिक्षण, ऐतिहासिक, सांख्याकिय तंत्राद्वारे पुराव्यानिशी संग्रहित करावी.
४. माहितीच्या सत्यतेची अचूकपणे पडताळणी करावी
५. माहिती मिळाविताना सर्व साधनांचा कौशल्याने वापर करावा.
६. व्यष्टी अध्ययन पद्धतीचे निष्कर्ष सुलभ रितीने स्पष्ट करावेत.

**सारांश —**

वरील व्यष्टी अध्ययनसंदर्भात दिलेली माहिती जसे व्यष्टी अध्ययनपद्धतीच्या व्याख्या, वैशिष्टये, प्रक्रिया, माहितीचे स्त्रोत, फायदे, मर्यादा, गृहितके, उदाहरणे, इत्यादी माहितीवरून आपणस असे दिसून येते की, व्यष्टी अध्ययनपद्धत ही संशोधन कार्यामध्ये महत्वपूर्ण भूमिका पार पाडते.

**संदर्भ ग्रंथ —**

1. Ahuja Ram (2001), Research Methods, Jaipur, Rawat Publication.
2. Giridhari, D.G.(2002), Research Methodology in Social Science, Aurangabad, Uday Publication.
3. Krishanswami, O.R (1993), Methodology of research in social science, Ed.1, Bombay, Himalaya publishing house.
4. Gupta Santhosh (1993), Research Methodology & Statistical Techniques, New Delhi, Deep & Deep Publication.
5. Tripathi S.M & other(2002), Descriptive Questions in library & Information Science, Ed.1, New Delhi, Ess Ess Publication.

❑❑❑